# बाभुळगाव येथे 'सायबर सुरक्षा ही काळाची गरज' विषयी मार्गदर्शन



बाभुळगाव जहांगीर : ग्रामपंचायत कार्यालय, बाभूळगाव येथे 'सायबर सुरक्षा ही काळाची गरज ' झालेली असून सायबर गुन्हे कमी करण्याच्या दृष्टीने कोणती काळजी घ्यावी या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील डॉ. हरिदास खरात, सायबर वॉरियर्स शितल साखरे, नेहा टेरे सलोनी जयस्वाल, वैष्णवी बेलंगे यांनी त्यांच्या मार्गदर्शनात मोबाईल, इंटरनेट वापरण्याचे फायदे आणि तोटे, चुकीच्या वापरामुळे होणारे गुन्हे आणि या ऑनलाईन गुन्ह्यापासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर माहिती सांगितली आणि सुरक्षित राहण्याचे आव्हान केले. सुरक्षा टिप्स असलेले माहिती पत्रकाचे यावेळी वाटप करण्यात आले. आम्ही मोबाईल, इंटरनेट चा योग्य वापर करू अशी शपथ दिली.यावेळी सरपंच सुशील भाऊ शिरसाट, उपसरपंच शाहरुख खान पठाण, राजेश ढोमणे, अनंत कुमार शिरसाट, श्रीकांत तावरे, प्रवीण पोहरे, गोपाल आखतकर, छोटू भाऊ राऊत, अंबादासजी डोंगरे, गजानन जाधव, इतर प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.

महासागर अकोला
23/10/2023